दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
● वर्ष १६ वे ● अंक २७० ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● शनिवार दि.२५ डिसेंबर २०२१ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com



# पनवेल महापालिका क्षेत्रात कोरोनाचे नियम कडक

## नाताळ आणि नववर्षाच्या पार्श्वभूमीवर रात्रीची जमावबंदी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

कोरोनाच्या उत्परीवर्तित ओमायक्रॉन विषाणूचा धोका वाढला असल्याने पालिका क्षेत्रात कोरोनाचे नियम पुन्हा कडक करण्यात आले आहे. तसेच राज्य शासनाच्या परिपत्रकानूसार नाताळ सण साधेपणाने साजरा करण्याच्या सूचना आयुक्त श्री.गणेश देशमुख यांनी दिल्या आहेत. तसेच नाताळ सण व नववर्षाच्या पार्श्वभूमीवर रात्रीची जमावबंदी घोषित करण्यात आली आहे.

राज्यात सर्वत्र ओमायक्रॉन रूग्ण वाढत असल्याचे दिसून येत असल्याने महानगरपालिका क्षेत्रात खबरदारीच्या दृष्टीने उपाय योजना करण्याबाबतीत आयुक्त गणेश देशमुख यांनी आज(२४ डिसेंबर) बैठक घेतली. उपायुक्त सचिन पवार, मुख्य वैद्यकिय आरोग्य अधिकारी डॉ. आनंद गोसावी, चारी प्रभाग अधिकारी यांच्यासह इतर पालिका अधिकारी यांची बैठक घेतली.

कोरोनाचे रूग्ण ज्या सोसोयटीत आढळतील त्या इमारतीमधील सर्व नागरिकांच्या चाचण्या करणे, तो भाग कंटेन्मेंट झोन म्हणून घोषित करणे तसेच लसीकरणावर भर देण्यासाठी दुसऱ्या डोसचे लसीकरण पूर्ण करण्याच्या दृष्टीने वैद्यकिय विभागाच्या टिम बरोबर प्रभागअधिकाऱ्यांनी सहकार्य करणाच्या सूचना आयुक्तांनी प्रभाग अधिकाऱ्यांना दिल्या.

याच बरोबर नाताळ आणि नववर्षाच्या



पार्श्वभूमीवर हॉटेल्समध्ये पन्नास टक्क्यांपेक्षा जास्त गर्दी असेल तर अशा हॉटेल्सवर कारवाई करण्याचे आदेश आयुक्तांनी दिले आहेत. दोन्ही डोस घेतल्याचे प्रमाणपत्र असलेल्यांनाच हॉटेलमध्ये प्रवेश देणे बंधनकारक राहील. बाजारपेठा, शहरातील मुख्य रस्ते, वाईन शॉप, गर्दीच्या ठिकाणांवर लक्ष ठेवणे तसेच रात्री जमावबंदी आदेशाची अमंलबजावणी कडक करण्याच्या सूचना प्रभाग अधिकाऱ्यांना आयुक्तांनी दिल्या आहेत.

याच बरोबर लग्न व इतर समारंभाही देखील पन्नास टक्के क्षमतेने करणे व समारंभासाठी आलेल्या सर्व नागरिकांचे दोन्ही डोसचे लसीकरण केलेले असणे व त्याची शहानिशा आयोजकांनी करणे बंधनकारक राहणार आहे. याची माहिती महापालिकेला देणेही बंधनकारक असणार आहे. अन्यथा अशा कार्यक्रमांच्या आयोजकांवर दंडात्मक कारवाई करण्यात येणार आहे.

### स्वच्छता मार्शलचे मास्क परिधान न करणाऱ्यांवर लक्ष

महापालिकेच्यावतीने ‘नो मास्क नो एन्ट्री’ धोरण सर्वत्र कडक राबविण्यात येणार आहे. स्वच्छता मार्शलची मास्क न परिधान करणाऱ्यांवर लक्ष ठेवणार आहेत. मास्क परिधान न करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करण्याच्या सूचना या मार्शल्सना देण्यात येणार आहेत. असे मार्शल्स चारही प्रभाग समितीमध्ये तैनात करण्यात येणार आहे.

### आ.प्रशांत ठाकूर यांची एस.टी.कर्मचाऱ्यांबाबत लक्षवेधी

## एस.टी.कर्मचाऱ्यांना १० तारखेच्या आत वेतन देणार : ना.अनिल परब

**दै.रायगड नगरी । पनवेल**

राज्यातील एसटी कामगारांचा संप दीर्घकाळ चालला असून त्यांच्या न्यायिक हक्कासाठी संपकऱ्यांना आमदार प्रशांत ठाकूर यांनी पाठिंबा दिला. इतकेच नव्हे तर सध्या मुंबईत सुरु असलेल्या विधिमंडळाच्या हिव–ाळी अधिवेशनात एसटी कर्मचाऱ्यांच्या हितासाठी प्रश्न मांडून कर्मचाऱ्यांना वेळेवर वेतन मिळण्याबाबत आणि वैद्यकीय देयके मिळण्याबाबत आवाज उठविला.

यावेळी सभागृहात बोलताना एसटी कमर्चाऱ्यांना न्याय देण्याची मागणी त्यांनी सरकारकडे केली. विलनीकरणाच्या मुद्यावर संप



दीर्घकाळ चालला आहे. त्याच्यापाठी प्रमुख मागण्या पगारवाढ, त्याचबरोबर वैद्यकीय बिलाची प्रतिपूर्ती होती. या संदर्भात राज्य सरकारकडून निधी उपलब्ध होईल तसे अदा केले जाईल असे उत्तर दिले असून वेतनवाढ ठराविक कालावधीने सातत्याने झाली पाहिजे. तसेच वैद्यकीय बिलांची पूर्तता करण्यासाठी शासनाकडून स्थायी स्वरूपाची व्यवस्था झाली पाहिजे अशी मागणी करतानाच, कर्मचाऱ्यांची एसटीचे विलनीकरणाची मागणी ठाम आहे. या संदर्भात शासन शासन काय करणार आहे, असा सवाल विधानसभेत आमदार प्रशांत ठाकूर यांनी उपस्थित केला. त्यामुळे कर्मचाऱ्यांना १० तारखेच्या वेतन देण्याचे आश्वासन परिवहन मंत्री अनिल परब यांनी देतानाच निधीची पूर्तता होताच वैद्यकीय बिलांचा विषय मार्गी लावणार असल्याचे आश्वासन दिले.

सभागृहात उत्तर देताना परिवहन मंत्री अनिल परब यांनी सांगितले कि, एसटी कर्मचाऱ्यांचे वेतन नियमित होत नव्हता. आता राज्य शासनाने दरमहा १० तारखेच्या आत वेतन करण्याची जबाबदारी घेतली आहे. गेल्या दोन वर्षांमध्ये एसटीच्या उत्पन्नात प्रचंड नुकसान झाले आहे. १२ हजार कोटींचा संचित तोटा असताना यावर्षी संपामुळे ६५० कोटी रुपयांचा आमचे नुकसान झाला आहे.

जो कराराचा भाग आहे तो आम्ही पूर्ण केला असून वैद्यकीय बिलांच्या बाबतीत निधीची मागणी झाली आहे. निधीची पूर्तता झाल्यावर ताबडतोब बिलांचा विषय प्राथमिकतेने घेतला जाईल.

## खोपोली शहरातील विविध समस्यांवर आम्ही खोपोलीकर आक्रमक

### नगरपरिषद कार्यालयासमोर लक्षणीय धरणे आंदोलन



**दै.रायगड नगरी । खोपोली**

खोपोली शहरात सध्या सर्व काही अलबेल आहे असे दिसत असले तरी अनेक छोट्या मोठ्या समस्या पूर्वीपासूनच शहरात पहायला मिळतात ज्यात प्रामुख्याने पालिका रुग्णालय, पिण्याचे पाणी, नाट्यगृह, गार्डन, अनधिकृत बांधकामे, पार्किंग समस्या, पालिकेतील कंत्राटी कामगारांच्या समस्या, अपंग/दिव्यांग बांधवांच्या समस्यांसह इतर काही समस्यांचा समावेश पहायला मिळतो.वारंवार लेखी निवेदन करून देखील प्रशासन हालचाल करत नसल्याचा आर–ोप करत आम्ही खोपोली कर या संघटने मार्फत एक दिवसीय लक्षणीय आंदोलन करण्यात आले.

आंदोलनची सुरुवात महाराष्ट्राचे आराध्य दैवत श्री. छत्रपती शिवाजी महाराज तसेच भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक यांना पुष्पहार व वंदन करून करण्यात आली. आंदोलना च्या सुरवातीच्या काही वेळात एकही प्रशासकीय अधिकारी अथवा लोकप्रतिनिधी आंदोलनेकर्त्यांना सामोरे न आल्याने आंदोलकांमद्ये नाराजीचा सूर दिसत होता. तद्नंतर आंदोलकांच्या भावना लक्षात घेत खोपोली नगरपरिषदेचे मुख्याधिकारी अनुप दुरे यांनी मुख्याधिकारी दालनात आंदोलक नागरिकांबरोबर व अधिकारी वर्गा सोबत चर्चा करून समस्या जाणून घेतले व या सर्व समस्यांवर लवकरच समाधानकारक कारवाई करण्यात येईल असे लेखी आश्वासन दिले.

या वेळी या आंदोलनात शमसुदिन शेख, मुस्कान सय्यद, मोहन केदार, संजय पाटील, विलास चाळके, राकेश मिरवणकर, निलेश मोडवे, प्रदीप मोरे, गणेश राक्षे, शशी मानकवले, प्रमोद गायकवाड, इंद्रसेन घोडके, रमेश पालांडे, महेश औरसंग, रविंद्र अवथनकर, सचिन यादव, किशोर साळुंके, तोफीक करजीकर, साजिद शेख, राहुल शेडगे, संदीप वाघमारे, मंगेश सावंत, इरफान शेख, सतीश येरुनकर, संजय तन्ना, मुस्तफा शेख, रोहित गायकवाड, अक्षय सकपाळ, प्रवीण कोल्हे, अशोक मोरे, विनोद राजपूत, के. के. कांबळे, फरीद शेख, दिपक कदम, आकाश जाधव, तय्यब खान, महेश काजळे यांसह नागरिक उपस्थित होते.

यावेळी सामाजिक कार्यकर्त्या सौ. सुवर्णा मोरे, शिवशाही व्यापारी संघटना चे अध्यक्ष युवराज दाखले तसेच R.P.I. मातंग समाजाचे तुषार कांबळे यांनी उपस्थिती दाखवत आंदोलनाला पाठींबा दर्शवला.

## संक्षिप्त...

### संपकरी एसटी कर्मचाऱ्यांना कामगार न्यायालयाची चपराक

**दै.रायगड नगरी । मुंबई**

एसटीच्या संपात सहभागी झालेल्या कामगारांना महामंडळाने बडतर्फीची, कारणे दाखवा नोटीस बजावली होती. या बडतर्फीच्या कारवाई विरोधात काही कर्मचाऱ्यांनी स्थानिक कामगार न्यायालयात तक्रार दाखल केली होती.

याबाबत निकाल देताना लातूर व यवतमाळ येथील कामगारांना न्यायालयाने एसटी महामंडळाच्या कारवाईला स्थगिती देण्यास नकार दिला आहे. न्यायालयाच्या या निकालानंतर महामंडळाकडून संबंधित ९ कामगारांना तात्काळ सेवेतून बडतर्फ करण्यात आले आहे.

लातूर व यवतमाळ विभागातील बेकायदेशीर संपामध्ये सहभागी झालेल्या कर्मचाऱ्यांना नियोजीत कामावर गैरहजर राहणे, एसटीच्या वाहतूकीस अडथळा निर्माण करणे, इतर कर्मचाऱ्यांना संपासाठी प्रवृत्त करणे, एसटीची वाहतूक बंद करणे, आर्थिक नुकसान करणे. या कारणांसाठी दोषारोप पत्र दाखल करून, समक्ष सुनावणी घेऊन राज्य परिवहन सेवेतून बडतर्फ का करण्यात येऊ नये, अशी कारणमिमांसा नोटीस बजावली होती.

या नोटीसीच्या विरोधात संबंधित कर्मचाऱ्यांनी कामगार न्यायालय, लातूर व यवतमाळकडे तक्रार (युएलपी) दाखल केली होती. या तक्रारीवर निकाल देताना कामगार न्यायालयाने संबंधित अर्जदाराची तक्रार अवैध ठरवून एसटीने केलेल्या कारवाईला स्थगिती देण्यास नकार दिला आहे.

## मत्स्यव्यवसाय मंत्र्यांच्या धोरणाविरुद्ध मच्छिमारांमध्ये तीव्र संताप

**दै.रायगड नगरी । उरण**

राज्य सरकारच्या मत्स्यव्यवसाय विभागाने नव्याने मंजूर केलेल्या अधिनियमा विरुद्ध मच्छिमारांमध्ये तीव्र असंतोष असून संताप व्यक्त होत आहे. या बाबत महाराष्ट्र राज्य मच्छिमार सहकारी संघाचे अध्यक्ष श्री. रामदास संधे यांनी करंजा येथे नवीन करंजा मत्स्य बंदराची पाहणी करून करंजा मच्छिमार सहकारी सोसायटी मध्ये भेट दिली. या मध्ये करंजा मच्छिमार सहकारी सोसायटीचे पदाधिकारी व इतरही मच्छिमार संस्थांच्या पदाधिकाऱ्यांसोबत सकारात्मक चर्च्या केली.

या चर्चेत मुख्यता नवीन सागरी अधिनियम, डिझेल कोटा १८ कोटीचा



वाटप त्वरित करण्यात यावा, १२० ए च च्या पुढे इंजिन असणाऱ्या नौकांना डिझेल परतावा गेल्या तीन वर्षा पासून वितरित न केल्या बद्दल रायगड जिल्ह्यातील काही मच्छिमार संस्थाच्या अद्याप पर्यंत कोकण पॅकेज अनुदान मिळाले नाही. तसेच मच्छिविक्रेत्या महिलांना सुद्धा अद्याप पर्यंत कोकण पॅकेजचे वितरण करण्यात आलेले नाही.डिझेल कोटा हा

.../२

## चर्चा...पैजा..उत्सुकता ; तळा नगरंचायतीत शिवसेना की राष्ट्रवादी काँग्रेस

**दै.रायगड नगरी । तळा**

तळा नगरपंचायत निवडणुकीचा निकाल लागण्यासाठी बराच अवधी असल्याने तालुक्याची उत्सुकता शिगेला पोचली आहे. तळा नगरपंचायतीमध्ये, कोणाला किती मते मिळतील, कसा होईल पराभव, कसा होईल विजय, मताधिक्य किती मिळेल, यावर गावांतील पारांपासून शहरातील बाजारपेठांपर्यंत याच चर्चा झडत आहे. शिवाय, हौशी कार्यकर्ते पैजा लावत आहेत.

तळा नगरपंचायत निवडणूकीसाठी सोमवारी मतदान झाले आहे. मतमोजणी १९ जानेवारी २०२२ ला होणार आहे. तळा शहरात उत्सुकता अधिक ताणली गेली आहे.नगरपंचायत निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसने त्यांच्या उमेदवारांसाठी सर्वच ताकद पणाला लावली, तर शिवसेना पुन्हा नगरपंचायतीवर भगवा फडकवा यासाठी सज्ज झाली आहे. भाजप, मनसे, वंचित बहुजन आघाडी यांनीही त्यांच्या उमेदवारांसाठी जोर लावला. यामुळे ही निवडणूक अतिशय चुरशीची आणि प्रतिष्ठेची बनली आहे. शिवाय खा.सुनील तटकरे, पालकमंत्री ना.अदिती तटकरे, आ.अनिकेत तटकरे यांनी घरोघरी जाऊन प्रचार केला तर शिवसेना यांनी स्थानिकांना सोबत घेत प्रचार केला त्यामुळे या लढाईत मतदार तटकरे कुटुंबाच्या आव्हानाला साथ देणार की स्थानिक शिवसैनिकां सोबत राहणार. यात कोण जिंकणार, जिल्हाच्या राजकीय वर्तुळातही महत्त्वपूर्ण लढत ठरली आहे

नगरपंचायत निवडणुकीसाठी काही प्रभागात चौरंगी काही ठिकाणी तिरंगी तर इतरत्र थेट दुरंगी सामना आहे. त्यामुळे सर्वच प्रभागात निकालाबाबत उत्सुकता ताणली गेली

.../२

सुधागडचे भाग्यविधाते, आमचे प्रेरणास्थान
।। जिवेत शरदः शतम् ।।
मा. श्री. वसंतशेठ ओसवाल
अध्यक्ष, सुधागड एज्युकेशन सोसायटी
यांना वाढदिवसाच्या






- शुभेच्छुक -
श्री. रविंद्र अरविंद लिमये (उपाध्यक्ष) सौ. गितावाई पालरेचा (कार्यवाह) श्री. रविकांत पंढरीनाथ घोसाळकर (सचिव) श्री. राजेंद्र बाजीराव पालवे (संचालक)
सुधागड एज्युकेशन सोसायटी, पाली, सुधागड-रायगड
संस्थेचे मराठी, हिंदी, इंग्रजी व उर्दू माध्यमातील प्राचार्य, मुख्याध्यापक, उपमुख्याध्यापक, पर्यवेक्षक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी वर्ग, विद्यार्थी व पालक

# कामकाज आणि कटुता

संसदेचे अधिवेशन सुरू होण्यापूर्वी बाहेर शांतता आणि सौहार्दाच्या वातावरणात कोणत्याही मुद्द्यावर चर्चा करण्याची तयारी दाखवायची; पण सभागृहात नेमकी अशी काही कृती करायची, की डिवचलेल्या विरोधकांना गोंधळ घालण्यावाचून पर्यायच राहू नये. या नीतीचा प्रभावी वापर करीत, मोदी सरकारने संसदेच्या हिवाळी अधिवेशनात कार्यभाग उरकून घेतला आणि गोंधळ-गदारोळात वाया गेलेल्या कामकाजाचे खापर विरोधी पक्षांवर फोडले. या अधिवेशनात मोदी सरकारने हवी तशी, हवी तेव्हा विधेयके मंजूर करून घेतलीच; पण ज्वलंत ठरणाऱ्या प्रश्नांवर आक्रमक झालेल्या विरोधकांना सरकारला धारेवर धरण्याची संधी मिळणार नाही, याचीही पुरेपूर व्यवस्था केली. पहिल्याच दिवशी शब्दाचीही चर्चा होऊ न देता तीन वादग्रस्त केंद्रीय कृषी कायदे रद्द केल्यामुळे विरोधकांचा क्षोभ झाला. विधेयक रद्द करतानाही चर्चा करण्याचे नियम आणि परंपरा मोडली गेल्याबद्दल क्षुब्ध विरोधकांनी लोकसभेत गोंधळ घातला. विरोधकांच्या या संतापात भर पडली ती काँग्रेस, शिवसेना, तृणमूल काँग्रेस, माकप आणि भाकपच्या बारा खासदारांना निलंबित केल्याने. ही कारवाई बेकायदा असल्याची ओरड करीत विरोधी पक्षांचे सदस्य सभागृहात गोंधळ घालत आणि संसदेबाहेर मोर्चे काढत राहिले. ते सरकारच्या पथ्यावर पडले. संसदेचे अधिवेशन संस्थगित झाल्यानंतर आदल्या अधिवेशनात घडलेल्या घटनेसाठी नियमांनुसार नव्या अधिवेशनात निलंबनाची शिक्षा देता येत नाही, याकडे विरोधक सतत लक्ष वेधत राहिले. त्यांचा दावा साफ फेटाळून, राज्यसभेने केलेल्या प्रस्तावानुसार कामकाजात व्यत्यय आणल्याबद्दल नियम २५६चा दाखला देत बारा खासदारांवरील निलंबनाची कारवाई मागे न घेण्यावर सभापती व्यंकय्या नायडू ठाम राहिले. या खासदारांनी माफी मागितली, तरच त्यांचे निलंबन घेतले जाईल, ही त्यांची अट होती. लखीमपूर खिरीतील शेतकऱ्यांच्या हत्येच्या प्रकरणात केंद्रीय गृह राज्यमंत्री अजय मिश्रा यांना पाठिशी घालून, सत्ताधारी भाजपने विरोधकांना आणखी डिवचले. कडाक्याच्या थंडीत संसद भवनाबाहेर महात्मा गांधींच्या प्रतिमेपाशी धरणे धरणाऱ्या बारा खासदारांची अवस्था बघून, समाजवादी पक्षाच्या खासदार जया बच्चन यांनी सरकारला शाप दिला. पत्रकारांनी सरकारधार्जिणे प्रश्न विचारल्याने राहुल गांधींचाही तोल गेला. या अधिवेशनात मोदी सरकारने लोकसभेत नऊ, तर राज्यसभेत दहा विधेयके मंजूर करून घेतली. विरोधकांचा आक्षेप असलेले मतदार ओळखपत्र आधार कार्डाशी जोडण्याचे विधेयकही दामटले. मतदार ओळखपत्र आधार कार्डाला जोडण्याची तरतूद कायद्याला धरून नसल्याने हे विधेयक संसदेच्या स्थायी समितीकडे पाठविण्यात यावे, ही विरोधकांची मागणी अमान्य करण्यात आली. मुलींच्या विवाहाचे वय एकवीस वर्षे करण्याच्या विधेयकाला पाच राज्यांतील विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर जनतेचे समर्थन मिळेलच याची खात्री नसल्यामुळे, ते स्थायी समितीकडे पाठविले. सीबीआय आणि सक्तवसुली महासंचालनालयाच्या संचालकांचा सेवाकाळ पाच वर्षांपर्यंत वाढविणारी वादग्रस्त विधेयकेही मंजूर झाली. न्यायाधीशांचे वेतनभत्ते आणि सेवाशर्तींचे विधेयकही पास झाले. आभासी मुद्रेच्या व्यवहाराला आळा घालण्यासाठी 'क्रिप्टो करन्सी' नियंत्रित करणारे विधेयक मांडले जाईल, अशी चर्चा होती; पण ते मंत्रिमंडळाच्या बैठकीतही आले नाही. करोनाच्या नावाखाली पत्रकारांचा संसदेतला प्रवेश मर्यादित ठेवण्यात आला. त्याविरुद्ध पत्रकारांनी मोर्चा काढला; पण त्याचा परिणाम झाला नाही. मागच्या वर्षी करोनाचे निमित्त करून संसदेचे हिवाळी अधिवेशन टाळले गेले. खरे तर त्यावेळी करोनाचा कहर पावसाळी अधिवेशनाच्या तुलनेत बराच सौम्य होता. त्यानंतर २०२१मध्ये अर्थसंकल्पी अधिवेशनही करोनाच्या दुसऱ्या भीषण लाटेमुळे मुदतीपूर्वीच गुंडाळावे लागले. त्यानंतरचे पावसाळी अधिवेशन मोदी सरकारने इस्रायली स्पायवेअर पेगॅससचा वापर केल्याच्या आरोपांमध्ये वाहून गेले. संसदेचे कामकाज ठप्प झाल्यावर आपल्यालाच दोष दिला जातो, याची जाणीव झालेल्या दीड डझन विरोधी पक्षांनी रणनीती बदलली. दोन्ही सभागृहांमध्ये चर्चेवर भर देत सरकारला धारेवर धरायचे आणि संसदेच्या बाहेर धरणे आंदोलन; तसेच मोर्चे काढून सरकारचा निषेध करायचा, असे डावपेच आखले. ते प्रभावी ठरले नाहीत. सभागृहाचे कामकाज वारंवार स्थगित होणे त्यामुळे थांबले नाही. नेहमीचे आरोप-प्रत्यारोप आणि गोंधळ-गदारोळात संपलेल्या हिवाळी अधिवेशनात सत्ताधारी भाजप संसदेत आणि विरोधी पक्ष रस्त्यावर असे चित्र दिसले. ब्रिटिशकालीन संसद भवनातील शेवटच्या ठरलेल्या या अधिवेशनाचा कडवट शेवट एक दिवस आधीच झाला. पुढच्या वर्षीचे हिवाळी अधिवेशन नव्या इमारतीत होईल. निदान तिथे तरी सत्ताधारी आणि विरोधकांमधील ही कटुता संपावी.

# विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे यांच्या हस्ते रांजणपाडा (जासई) येथील नवीन स्मशानभूमीचे भूमिपूजन

**दै.रायगड नगरी । पनवेल**



रांजणपाडा (जासई) येथिल नवीन स्मशानभूमीचे भूमिपूजन पनवेल महानगरपालिकेचे विरोधी पक्ष नेते प्रितम म्हात्रे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी उरण तालुका पुरोगामी युवक संघटना अध्यक्ष रमाकांत म्हात्रे, ग्रा.पं सदस्य तेजस पाटील, एकनाथ घरत, सौ.रुपाली पाटील, मा.सरपंच धीरज घरत, मा.उपसरपंच प्रकाश पाटील, मा.उपसरपंच सौ.ममता रमाकांत म्हात्रे मा.उपसरपंच रमेश पाटील, मा.सदस्य मुरलीधर ठाकूर, सुदर्शन पाटील, ग्रामस्थ संतोष ठाकूर, श्याम पाटील, महादेव पाटील, आदेश पाटील, संदेश घरत, मिथुन म्हात्रे व इतर ग्रामस्थ उपस्थित होते.

रांजणपाडा गावातील जुन्या स्मशानभूमीची जागा रेल्वे प्रकल्पात प्रस्तावित असल्याकारणाने नवीन स्मशानभूमी उभाण्यासाठी उरण तालुका पुरोगामी युवक संघटना अध्यक्ष रमाकांत म्हात्रे, ग्रामपंचायत सदस्य तेजस पाटील, एकनाथ घरत, सौ.रूपाली पाटील व सुदर्शन पाटील यांनी विशेष प्रयत्न करत रेल्वे प्रशासन, जे.एन.पी.टी व टाटा समूह यांची संयुक्त बैठक घेतली. नवीन स्मशानभूमीसाठी जे.एन.पी.टी कडून भूखंड घेण्यात आले तसेच स्मशानभूमीसाठी लागणार खर्च टाटा समूह करीत आहे. सदर स्मशानभूमी करीता चंद्रकांत परशुराम पाटील यांनी भूखंड दिल्याबद्दल विरोधी पक्ष नेते प्रितम म्हात्रे यांनी त्यांचे आभार मानले.

# वडाळे तलावाला दि. बा. पाटील यांचे नाव देण्याची शिवसेनेची मागणी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

शहरातील मुख्य ठिकाणी असलेल्या व नुकतेच सुशोभिकरण केलेल्या वडाळे तलावाला वंदनीय दि. बा. पाटील यांचे नाव देण्याची मागणी शिवसेना जिल्हा सल्लागार बबन पाटील यांनी महापौर डॉ. कविता चौतमोल यांना दिलेल्या निवेदनाद्वारे केली आहे.

यात बबन पाटील यांनी म्हटले आहे की, पनवेल तालुक्याला अनेक महान व्यक्तीमत्वांची वारसा लाभलेला आहे. त्यात वंदनीय दि. बा. पाटील हे या तीनही तालुक्यातील समस्त नागरिकांचे आधारस्तंभ म्हणून जाणले जातात. दि. बा. पाटील यांनी प्रकल्पग्रस्तांसाठी केलेल्या अतुलनीय कार्यामुळेच आज हा परिसर बहरलेला आहे. त्यासाठीच आम्ही वंदनीय दि. बा. पाटील प्रकल्पग्रस्त समितीच्या माध्यमातून आपल्याकडे विनंती करत आहोत कि, या महान व्यक्तिमत्वाचा गौरव करण्यासाठी नव्यानेच सुशोभित करण्यात आलेल्या पनवेलमधील वडाळे तलावाला वंदनीय दि. बा. पाटील यांचे नाव देऊन साहेबांचा पुर्णाकृती पुतळा या परिसरात उभारल जावा.

# नगरविकास व सार्वजनिक बांधकाम मंत्री एकनाथ शिंदे रायगड जिल्ह्याच्या दौऱ्यावर

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

राज्याचे नगरविकास व सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री एकनाथ शिंदे यांचा जिल्हा दौरा खालीलप्रमाणे-

रविवार दि.२६ डिसेंबर २०२१ रोजी दुपारी १.५५ वा. ठाणे निवासस्थानाकडून रेमंड हेलिपॅड ठाणे येथे मोटारीने प्रयाण. दुपारी २.०० वा. रेमंड हेलिपॅड ठाणे येथून हेलिकॉप्टरने सासवणे रेमंड हेलिपॅड अलिबाग, जि.रायगडकडे प्रयाण. दुपारी २.२० वा. सासवणे रेमंड हेलिपॅड, ता.अलिबाग येथे आगमन. दुपारी २.२५ वा. सासवणे रेमंड हेलिपॅड अलिबाग येथून थळ आर.सी.एफ., राजमाळा, ता.अलिबाग येथे मोटारीने प्रयाण. दुपारी २.४० वा. थळ आर.सी.एफ., राजमाळा, ता.अलिबाग येथे आगमन व आमदार महेंद्र दळवी यांचे सुपूत्र चि.अभिराज यांच्या हळदी समारंभास उपस्थिती. दुपारी ३.१५ वा. थळ आर.सी.एफ.,राजमाळा, ता.अलिबाग येथून मोटारीने सासवणे रेमंड हेलिपॅडकडे प्रयाण. दुपारी ३.३५ वा. सासवणे रेमंड हेलिपॅड येथून हेलिकॉप्टरने रेमंड हेलिपॅड ठाण्याकडे प्रयाण.



# नाताळ निमित्त उरण चर्च येथे विविध सजावट



**दै.रायगड नगरी । उरण**

नाताळ निमित्ताने उरण शहरातील शुद्धता माता चर्च येथे प्रमुख धर्मगुरू उरण चर्च मार्शल लोपीस यांच्या मार्गदर्शनाखाली उरण चर्च विविध सजावट करण्यात आली संता क्लोज ,व इतर सजावट करण्यात आली होती.

शुक्रवारी (दि. २४ ) रोजी रात्री मिसा ( प्रार्थना ) शनिवार ( दि. २५ ) नाताळ निमित्त सर्व खिर्स्ती बांधवाना शुभेच्छा कार्यक्रम होणार आहे.


## जाहीर नोटीस

सर्व तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल १) शब्बीर मोहम्मद इब्राहीम शेख / फरहाना शब्बीर शेख २) दर्शन गजभिये ३) ग्रेटा फ्लोड पिंटो ४) वेणुकुमारी ठाकूर / पप्पू बाबू ठाकूर ५) प्रिती ज्ञानस्वरुप दुग्गल ६) चंद्रकांत खोलाडकर ७) जगन्नाथ पाय ८) अशोक पावडे यांनी खालील वर्णन केलेल्या मिळकती १) धनाजी हरी पाटील

मिळकतीचे वर्णन

**मौजे : विंधणे, तालुका : उरण, जिल्हा : रायगड येथील शेतजमीन मिळकत**

| सर्वे नं. हिस्सा नं. | क्षेत्रफळ हे.आर.पॉ. | पोटखराबा हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| १४६/६ | ०.२२.०० | ०.०४.०० | १.१२ |

तरी सदर मिळकतीबाबत होणाऱ्या व्यवहारास कोणीही व्यक्तीची / संस्थेची कोणत्याही स्वरुपाची हरकत, दावा, तक्रार, दंग, दावा, वहिवाटी हक्क, हितसंबंध, खरेदी, गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, साठेकरार, भाडेकरार, वारसा, हक्क, पोटगी, लिज, सबलिझ, लिएन, सदर मिळकतीतून जाण्या-येण्याचे वहिवाटी अथवा इजमेंटचे हक्क इत्यादी अगर कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास त्यांनी आपली हरकत लेखी स्वरुपात ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांचे आत खाली दिलेल्या पत्यावर कळवावी. या मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत असल्याचे समजून आमचे अशिल सदर वर मिळकतीच्या मालकाशी खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर कोणाचीही तक्रार आल्यास ती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

बेलापूर

दि.२२/१२/२०२१

**सही/-**
**ॲड.निखत शेख**
**(बी.कॉम.एल.एल.बी.)**
**ऑफिस पत्ता : ऑफिस नं.बी ५५/५६, अग्रवाल टेड सेंटर, ५ वा मजला, प्लॉट नं.६२, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४००६१४**
**फोन नं.९३२३१४०६४३**


# आरटीओ कर्मचाऱ्याचा मृत्यू

**दै.रायगड नगरी । पनवेल**

भरधाव टँकरची धडक रस्ता ओलांडणाऱ्या आरटीओ कर्मचाऱ्याला बसल्याने झालेल्या अपघातात त्याचा दुर्दैवी मृत्यु झाला आहे.

कमलेश पारकर (वय-४७) हा पनवेल आरटीओ कार्यालयात शिपाई म्हणून कार्यरत आहे. तो बिमा फ्लायओव्हर पुलानजिक मुंब्रा-पनवेल महामार्ग ओलांडून जात असताना त्याला भरधाव टँकरची धडक बसल्याने तो जखमी झाला आहे.

त्यामुळे तात्काळ त्याला उपचारार्थ नजिकच्या रूग्णालयात दाखल करण्यात आले होते. परंतु तेथे त्याचा मृत्यु झाला आहे.


मा.श्री.गोडसे सो.

ॲड.अनिल रा. नागदेवे
ॲड.संजय के. कानडे
ॲड.गौरव संजय कानडे

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्र.७१८/२०२१
नि.नं.७/ड
ने.ता.२९/०१/२०२२

कै.रमेश जगन्नाथ पार्टे यांचे वारस
१) श्रीमती.सुभद्रा रमेश पार्टे
वय : ४८ वर्षे, धंदा : गृहिणी
२) श्री.राजेश रमेश पार्टे
वय : २७ वर्षे, धंदा : नोकरी
३) श्री.संदेश रमेश पार्टे
वय : २२ वर्षे, धंदा : शिक्षण
रा.सिडको कॉलनी, ए-टाइप,
रुम नं.७, चाळ नं.२०, सेक्टर १३,
नवीन पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड ..... अर्जदार

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, कै.रमेश जगन्नाथ पार्टे यांचे दि.२३/१०/२०१८ रोजी नवीन पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड येथे निधन झालेले आहे. कै.रमेश जगन्नाथ पार्टे यांचे सामाईक मालकीची खालील वर्णनाची स्थावर मिळकत आहे.

**सदर स्थावर मिळकतीचे वर्णन**

| मिळकत | क्षेत्र | किंमत |
|---|---|---|
| सिडको कॉलनी, ए-टाईप, रुम नं.७, चाळ नं.२०, सेक्टर-१३, प्लॉट नं.०९, नवीन पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड | १३.५० चौ.मीटर | रु.१,४०,०००/- |

सबब खालील मिळकतीसाठी वारस दाखला मिळावा म्हणून अर्जदार यांनी मे.कोर्टात अर्ज केलेला आहे.

तरी अर्जदार यांच्या वारसा हक्काबद्दल कोणत्याही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्याच्या आत ह्या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकती घ्यावयाच्या आहेत, जर या कालावधीमध्ये योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत, तर हे मे.कोर्ट अर्जदार यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि जर अर्जदार हे कै.रमेश जगन्नाथ पार्टे यांचे वारसदार आहेत असे सिद्ध झाल्यास अर्जदारांना वारसदाखला मंजूर करण्यात येईल.

आज दि.२४/१२/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — (कोर्टाचा शिक्का) — **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**


# विजय विकास सामाजिक संस्थे तर्फे कराटे स्पर्धा संपन्न

**दै.रायगड नगरी । उरण**

२३/ १२/२०२१ रोजी विजय विकास सामाजिक संस्था यांच्या माध्यमातून सेल्फ डिफेन्स कराटे अकॅडमी कराटे इन्स्ट्रक्टर असोशियन तर्फे कराटे बेल्ट एक्झाम घेण्यात आली. त्यामध्ये साठ मुलांनी सहभाग घेतला.चार तास सतत परीक्षा घेतल्यानंतर त्यांना प्रमाणपत्र व बेल्ट देण्यात आले.

या कार्यक्रमा साठी माजी आमदार तथा शिवसेना रायगड जिल्हा प्रमुख मनोहरशेठ भोईर तसेच जिल्हा परिषद सदस्य विजय भोईर, कामगार नेते महादेव घरत तसेच ज्यांच्या अंतर्गत बेल्ट परीक्षा घेण्यात आली असे दीपक घरत, विकास भोईर, दर्शन घरत, प्रगती भोईर,विशाल डाके,प्रकाश घरत, सागर कडू,मच्छिंद्र घरत, अजय तांडेल असे वरिष्ठ मान्यवर ब्लॅक बेल्ट परीक्षा घेण्यासाठी आवर्जून हजर होते. माजी आमदार मनोहरशेठ भोईर यांनी मुलांशी संवाद साधताना कराटे कशासाठी आत्मसात केलं पाहिजे व भविष्यामध्ये आपल्यावर स्वतःवर अन्याय होऊ नये व पुर्ण गावोगावी याचा प्रसार प्रचार करावा असे नमूद करून त्यासाठी लागणारी भरीव मदत करण्यासाठी मी तुमच्या पाठीशी आहे असे सांगितले. सदर स्पर्धा नवीन शेवा गावांमध्ये ही बेल्ट परीक्षा घेण्यात आली. या स्पर्धेला स्पर्धक व जनतेचा उत्तम प्रतिसाद लाभला.


## ग्रामपंचायत आकुर्ली, ता.पनवेल, जि.रायगड

## जाहीर निविदा

सर्व अधिकृत ठेकेदार यांस कळविण्यात येते की, खालील प्रमाणे कामासाठी सिलबंद निविदा मागविण्यात येत आहेत. तरी अधिकृत ठेकेदारांनी दिनांक २५/१२/२०२१ ते ३०/१२/२०२१ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत निविदा पाठवाव्यात. आलेल्या निविदा त्यास दिवशी शक्य झाल्यास दिनांक ३१/१२/२०२१ सकाळी ११.०० वाजता उघडण्यात येतील. त्यावेळी उपस्थित रहावे. कोणतीही एक अगर सर्वच निविदा मंजूर करणे अगर नाकारणेचा अधिकार खालील सही करणार यांनी राखून ठेवला आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाज पत्रकीय रक्कम रुपये | इसारा रक्कम १% | निविदा फॉर्म मिळण्याची मुदत | निविदा पाठविणेची अंतिम तारीख |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | ग्रामपंचायत आकुर्ली हद्दीत गटार दुरुस्ती व गटार साफसफाई करणे. (१५ वा वित्त आयोग सन २०२०-२०२१ बंधित निधी) | १०७३१८ | १०७३ | २५/१२/२१ | ३०/१२/२१ |
| २ | सांडपाणी व घनचकरा व्यवस्थापन (जिल्हा परिषद निधी) | १५८१०१ | १५८१ | २५/१२/२१ | ३०/१२/२१ |
| ३ | विशेष रेसिडेन्सित अपेक्षा कॉम्प्लेक्स सर्कल पर्यंत पाईप गटार करणे. (सन २०२०-२०२१ वर्षातील अपूर्ण काम पूर्ण करणे) (१५ वा वित्त आयोग बंधित निधी सन २०२१-२०२२) | ५१९११५ | ५१९१ | २५/१२/२१ | ३०/१२/२१ |
| ४ | वासुदेव शेळके ते हनुमान मंदिर ते भाऊ पाटील पर्यंत पाईप गटार व आर.सी.सी. रस्ता करणे. (१५ वा वित्त आयोग सन २०२१-२२ बंधित निधी) | ५१९११५ | ५१९१ | २५/१२/२१ | ३०/१२/२१ |
| ५ | ग्रामपंचायत आकुर्ली हद्दीतील सर्व गोळा केलेला कचरा उचलून नेण्याकरिता ग्रामपंचायतीकडे कोटेशन सादर करणे. (सदर महिना करिता) | ३०००० | २९८५ | २५/१२/२१ | ३०/१२/२१ |

अटी / शर्ती

१) सदर कामाचे अंदाजपत्रक कार्यालयीन वेळात पहावयास मिळेल.
२) इसारा रक्कम रोखीत भरावा लागेल.
३) निविदा किंमत नापरतावा समजावी.
४) नियमाप्रमाणे आयकर तसेच इतर कर भरावे लागतील.
५) अधिकृत ठेकेदाराने निविदा न भरल्यास अनुभवी ठेकेदाराचा विचार केला जाईल.
६) निविदा मंजूर केल्यास रु.५००/- चे स्टॅम्प पेपरवर करारनामा करून द्यावा लागेल.
७) ५% सुरक्षा अनामत प्रत्येक बिलातून कपात केली जाईल.
८) इसारा व सुरक्षा अनामत ९० दिवसानी कामाचा दर्जा पाहून परत मिळेल.
९) वर्क ऑर्डर प्रमाणे मुदतीत काम पूर्ण न झाल्यास व दुसऱ्या ठेकेदारांकडून ग्रामपंचायतीने काम करून घेतल्यास होणाऱ्या खर्चास जबाबदार रहावे लागेल.
१०) वरील अटी मान्य असणाऱ्यांनीच निविदा भरावी.

**सही/-** **सौ.भारती सचिन पाटील** **सरपंच** **ग्रामपंचायत आकुर्ली** **ता.पनवेल, जि.रायगड**

**सही/-** **श्री.जयेंद्र घनश्याम म्हात्रे** **ग्रामसेवक** **ग्रामपंचायत आकुर्ली** **ता.पनवेल, जि.रायगड**


पृष्ठ क्र.१ वरुन...

## मत्स्यव्यवसाय मंत्र्यांच्या धोरणाविरुद्ध मच्छिमारांमध्ये तीव्र संताप

वार्षिक कालावधी साठी मंजूर करावा.

पर्ससीन मासेमारी बोटिंवर मासेमारी करून ससून डॉक बंदर येथे येताना केसेस करून नाहक त्रास देऊन विविध कारणे दाखवून कारवाई करण्यात येते. या उलट महाराष्ट्राच्या जलधी क्षेत्रात बेकायदेशीर प्रवेश करून शेजारी राज्यातील बोटी राजरोस पणे मासेमारी करतात यांच्या वर मात्र कोणतीही कारवाई होत असताना दिसत नाही . अशा सर्व महत्वाच्या विषया बद्दल शासनाने दखल घेऊन तात्काळ कार्यवाही करणे गरजेचे आहे.

अशा मच्छिमार बांधवानी आपल्या समस्या व्यक्त केल्या. यावेळी वैषवी माता मच्छिमार सोसायटीचे चेअरमन मार्तंड नाखवा, मार्तंड प्रसन्न कुलाबा मच्छिमार सहकारी सोसायटीचे चेअरमन अमोल रोगे, द्रोणागिरी मच्छिमार सोसायटीचे चेअरमन गोरख नाखवा, चाणजे ग्रामपंचायतीचे उपसरपंच अशोक कोळी, भारत नाखवा, यशवंत नाखवा, करण कोळी, कैलास नाखवा, विकास नाखवा इत्यादी मच्छिमार संस्थांचे पदाधिकारी व मच्छिमार बांधव उपस्थित होते.

## चर्चा...पैजा..उत्सुकता ; तळा नगरंचायतीत शिवसेना की राष्ट्रवादी काँग्रेस

आहे. तळा शहर हा शिवसेनेचा बालेकिल्ला मानला जात असल्याने या शहरात शिवसेनेची काय अवस्था होणार, यावर रायगड जिल्ह्यात शीवसेनेच्या ताकदीवरही चर्चा होणार आहे. दोन्ही उमेदवारांचे समर्थक कार्यकर्ते तर आपल्याच उमेदवाराचा विजय होणार, यातून पैजा लावू लागले आहेत. त्यामुळे जेवणासह नव वर्षासाठी भेटवस्तू देणे यापर्यंत पैजा लावल्या जात आहेत. मात्र, कार्यकर्ते, सर्वसामान्यांकडून वेगवेगळ्या चर्चा ऐकण्यास मिळत असल्याने पैजा लावणाऱ्यांचे धाबेही दणाणू लागले आहेत. शिवाय, उमेदवारही कोणत्या प्रभागात गावात, गटांत, शहरातील किती मते मिळणार, याचे अंदाज बांधण्यात व्यस्त आहेत. उमेदवारांच्या स्तरावर प्रभाग निहाय मताधिक्याचा आकडेमोडीचा खेळ सुरू आहे. नगरपंचायतीच्या दृष्टीने अमूक प्रभागातील या उमेदवाराचा आपल्याला फायदा होईल, तर या उमेदवाराचा विजय आपल्या पथ्यावर पडेल, अशा जमा, वजाबाकींची आकडेमोड सुरू आहे. त्यातून कोण घासून येणार, कोण ठासून येणार, याबाबतही तर्कवितर्क लढविले जात आहेत. निकालाची हवा चांगलीच तापली असून, निकालानंतरच हे वातावरण शांत होणार आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले. दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## विहूर येथे नऊगांव कुणबी समाज-सर्वे तर्फे दिनदर्शिका प्रकाशन सोहळा संपन्न

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

मुरुड तालुक्यातील विहूर येथे कुणबी समाजाच्या आयोजित कार्यक्रमाप्रसंगी नऊगांव कुणबी समाज-सर्वेतर्फे दिनदर्शिकेचे प्रकाशन समाजाचे उपाध्यक्ष आत्माराम नाईक मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून मजगांव येथील प्रसिद्ध मुर्तीकार चंद्रकांत बुल्लू, ज्येष्ठ पत्रकार मदन हणमंते यांसह सर्वे,विहूर,सुपेगांव, काशिद, मुरुड,एकदरा,महालोर, नांदगाव व शिघ्रे गावातील प्रतिनिधी व समाजबांधव उपस्थित होते. सुरुवातीला सर्व उपस्थितांचे स्वागत करण्यात येऊन कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली. संपूर्ण तालुक्यात कुणबी समाजातर्फे राबविण्यात येणा-या विविध उपक्रमांचे तसेच आयोजित दिनदर्शिका प्रकाशन सोहळ्याचे मदन हणमंते यांनी आपल्या मनोगतात कौतुक केले.यावेळी नऊगांव कुणबी समाजाचे सचीव दामोदर बांद्रे यांनी आपले विचार मांडले.प्रास्ताविक उदय महाडिक यांनी केले.सुत्रसंचालन रुपेश बांद्रे यांनी तर संतोष पोटले यांनी दिनदर्शिका जाहिरातदार व सर्व समाजबांधवांचे आभार मानले. नऊगांव कुणबी समाज संघटनेचे अध्यक्ष हरिश्चंद्र कांगणे, सहसचिव शशिकांत बांद्रे, सल्लागार सुशिल खोपकर,सहखजिनदार निलेश खामकर तसेच विहूर गावातील समाजबांधव व महिला मंडळाने कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विशेष परिश्रम घेतले.



# माथेरान नागरी सहकारी पतसंस्थेतील सभापतींची मुदत संपल्यामुळे राजीनामा द्यावा : वसंत कदम

**दै.रायगड नगरी । माथेरान**

माथेरान नागरी सहकारी पतसंस्थेची निवडणूक लांबल्याने सहकारी पतसंस्थेच्या सभापतीपदी असलेले हेमतं पवार यांना त्यांची मुदत संपल्यानंतर नंतर ही ते पद भुषवित आ-हेत. मागच्या वेळी काँग्रेस, राष्ट्रवादी, शिवसेना, भा.ज.पा मिळुन विस, विस महिने अध्यक्ष पद भुषवायच ठरले होते. त्याप्रमाणे पहिल्या वीस महीने अजय सावंत, यांनी व त्यानंतरच्या वीस महीने स्वर्गिय हेमंत बिरामणे आणि शेवटचे वीस महीने हेमंत पवार हे सभापती पदावर आहेत.

पवार यांचे वीस सहीने संपुन बरेच महीने झालेत. व पतसंस्थेची निवडणूक ही लांबली आहे. त्यामुळे अध्यक्षाने राजीनामा देऊन दुसऱ्या संचालकांला अध्यक्षपदाची संधी द्यावी.



कारण मिटींगला ठराविक सदस्यच उपस्थित असतात त्यामुळे लोकशाहीचा मान ठेवूनही स्वतःहुन राजीनामा दिल्यास त्यात मान आहे. संस्था सर्व सभासदांची आहे. त्यामुळे दोघेच संस्था चालवतात असे चित्र दिसु नये.यासाठी पवार यांनी स्वखुशीने राजीनामा द्यावा अशी मागणी संचालक वसंत नारायण कदम यांनी केली आहे.

यावेळी बोलताना माजी सभापती अजय सावंत म्हणाले की, पतसंस्थेच्या निवडणूकीला वेळ आहे त्यामुळे सध्या हेमंत पवार हे सभापती पदावर कार्यरत आहेत त्यांची ठरल्याप्रमाणे वीस महिन्यांची मुदत संपलेली आहे त्यामुळे त्यांनी नैतिकतेला धरून अन्य संचालकास त्या जागी काम करण्याची संधी द्यायला हवी. तर योगेश जाधव म्हणाले की, या संस्थेची मुदत ७ एप्रिल २०२० मध्ये संपलेली आहे.

कोरोनाच्या एक दोन लाटेमुळे महाराष्ट्र राज्यातील सर्व सहकारी संस्थांच्या निवडणुका लांबणीवर गेल्या त्यामुळे महाराष्ट्र सरकारच्या सहकार्य खात्याने नवीन निवडणूका होऊन नवीन संचालक मंडळ अस्तित्वात येईपर्यंत विद्यमान संचालक मंडळाला प्रभारी कारभार पाहण्यासाठी मुदतवाढ देण्यात आली आहे. यापूर्वी सुध्दा २०११ मध्ये संस्थेच्या संचालक मंडळाची मुदत संपली असताना २०१५ पर्यंत नव्यानं संचालक मंडळ अस्तित्वात येईपर्यंत तत्कालीन संचालक मंडळाला मुदतवाढ देण्यात आली होती.

सद्यस्थितीत प्रलंबित सहकारी संस्थांच्या निवडणुका पहिल्या टप्प्यातील सुरू आहेत. तर माथेरान नागरी सहकारी पतसंस्थेची निवडणूक ही चौथ्या टप्प्यात होईल असा अंदाज आहे. तसा कार्यक्रम निवडणूक प्राधिकरण सहकारी संस्था पुणे यांच्या मार्फत रीतसर जाहीर केला जाईल.

## मुरुडच्या वसंतराव नाईक महाविद्यालयात जागतिक एडस दिन व सप्ताह साजरा

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

जागतिक एड्स दिन व सप्ताह चे औचित्य साधून मुरुडच्या वसंतराव नाईक महाविद्यालय व आय सी टी सी विभाग ,ग्रामीण रुग्णालय मुरूड यांच्या संयुक्त विद्यमाने एच आय व्ही(एड्स) व टीबी या आजाराबद्दल विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले.या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ विश्वास चव्हाण, तसेच प्रमुख पाहुणे व वक्ते म्हणून ग्रामीण रुग्णालयाचे समुपदेशक सचिन जाधव व वरिष्ठ औषधोपचार पर्यवेक्षक(टीबी) संकेत घरत यांचे मार्गदर्शन लाभले. यावेळी व्यासपीठावर राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ श्रीशैल बहिरगुंडे,गजानन मुनेश्वर, डॉ देविदास रौंदळ,डॉ सिमा नाहिदा, डॉ मधुकर वेदपाठक, डॉ सुभाष म्हात्रे, कांबळे जे के आदी. उपस्थित होते.

यावेळी सचिन जाधव यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना एच आय व्ही(एड्स) बाबत अत्यंत उपयुक्त माहिती दिली.हा आजार बाधित किंवा एका पेक्षा जास्त व्यक्ती सोबत असुरक्षित शारिरिक संबंध ठेवल्याने,बाधित सुई किंवा इंजेक्शन,बाधित व्यक्ती चे रक्त व रक्तघटक घेतल्याने,आणि संसर्गित आईवडीलापासून त्यांच्या होणाऱ्या बाळाला,या चार कारणातूनच हा आजार होत असल्याचे सांगितले. अशक्तपणा, थकवा, अंगावर पुरळ किंवा नागीण येणे, रोज रात्री हलकासा ताप, खोकला वगैरे ही लक्षणे या आजाराची असून, अशी काही लक्षणे आढळल्यास जवळच्या शासकीय रुग्णालयात जाऊन आपली एच आय व्ही तपासणी मोफत करून घ्यावी. असे सांगितले. एकमेकांसोबत राहिल्याने, एकमेकांचे कपडे, अंथरून पांघरून वापरल्याने,एकच संडास किंवा भांडे वापरल्यामुळे हा आजार होत नाही, त्यामुळेच बाधित व्यक्तीला आपल्यापासून दूर करू नका, त्याला प्रेम,माया द्या, त्याला समाजात सन्मानाने जगू द्या, असे सांगितले.हा आजार होऊ नये म्हणून असुरक्षित शारीरिक संबंध टाळावे, नेहमी कंडोमचा वापर करावा, रक्त किंवा रक्तघटक घेताना ते शासकीय रक्त पेढीतूनच किंवा योग्य तपासणी करूनच रक्त घ्यावे, आईवडिलांना असेल तर त्यांना वेळी च योग्य औषधोपचार चालू करून त्यांच्या होणाऱ्या बाळाला या आजारापासून वाचवण्याचे प्रयत्न करावे,तसेच या आजारांवर आजपर्यंत कुठलीही लस किंवा औषध उपलब्ध नसून ए आर टी औषधोपचार घेतल्यास रुग्ण चांगल्या प्रकारे आपले जीवनमान जगू शकतो.महाविद्यालयीन युवकांनी जास्तीत जास्त संख्येने आपली एच आय व्ही तपासणी करून घ्यावी, लग्नाअगोदर मुलगा किंवा मुलगी दोघांनी मिळून एच आय व्ही तपासणी करून घ्यावी,व या आजाराला निर्बंध घालावा, असे प्रतिपादन केले.

तसेच वरिष्ठ टीबी औषधोपचार पर्यवेक्षक संकेत घरत यांनी टी बी आजाराविषयी माहिती देताना टीबी म्हणजे काय, त्याची लक्षणे, कारणे, व औषधोपचार याची उपयुक्त माहिती दिली. टीबी हा आजार संपूर्ण औषधोपचाराने १००टक्के बरा होतो. त्यामुळे टीबी ची लक्षणे दिसताच तात्काळ जवळच्या शासकीय रुग्णालयात जाऊन थुंकी नमूना देऊन, एक्सरे काढून आपले निदान करून घ्यावे, व योग्य औषधोपचार घेऊन टीबी ला हरवावे, असे सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक गजानन मुनेश्वर यांनी केले तर डॉ सीमा नाहिदा यांनी आभार मानले.

## रोहे तालुका आगरी चषकावर आगरी बॉंईजने आपले नाव कोरले

**दै.रायगड नगरी । खांब-रोहा**

रोहे तालुका आगरी ज्ञाती सेवा मंडळ रोठ ग्रुप यांच्या वतीने आगरी महोत्सवास अंतर्गत संपन्न करण्यात आलेल्या तालुकास्तरीय भव्यदिव्य आगरी चषकावर आगरी बॉंईज संघाने सर्वोत्तम कामगिरी करून आपले नाव कोरले.

या महोत्सवाचे व आगरी चषकाचे शानदार उद्घाटन अध्यक्ष हरिश्चंद्र मोरे,उपाध्यक्ष रोहिदास कोल्हटकर,खेळू वारगे आदींच्या हस्ते करण्यात आले. यावेळी सचिव रामचंद्र मोरे, देवराम कर्णे कर, खजिनदार सचिन मोरे, विलास डाके, कार्याध्यक्ष लक्ष्मण मोरे, दिलिप वारंगे, सल्लागार किशोर मोरे तसेच अमित घाग, जनार्दन मोरे, रोठ खु.सरपंच गीता मोरे आदींसह मोठ्या संख्येने समाजबांधव व भगिनी उपस्थित होते. तर स्पर्धेतील द्वितीय क्र.रोहा रॉंयल्स तर तुतीय व चतुर्थ क्र.अनुक्रमे गवळवाडी व सुदर्शन केमिकल यांनी पटकावले. तसेच स्पर्धेतील मॅंन ऑफ द मॅंच नयन जोशी, बेस्ट बॉंलर निशी कर्णेकर व बेस्ट बॅंटस्मन रिझवान यांना वरसे सरपंच नरेश पाटील, रोठ सरपंच गीता मोरे, नितीन वारंगे, रामा म्हात्रे, हरिश्चंद्र वाजंत्री, लिलाधर मोरे, अप्पा मोरे, लक्ष्मण मोरे, अमोल घाग, अमोल ढमाले आदी प्रमुख मान्यवरांचे हस्ते सन्मानित करण्यात आले. या आगरी महोत्सव व चषकाचे यशस्वीतेसाठी रोठ खु., रोठ बु.ग्रामस्थ, महिला मंडळ व तरूण मंडळाने मोलाचे सहकार्य केले.



# उरण तालुका युवा आगरी सेना प्रमुख पदी देवेंद्र तांडेल

**दै.रायगड नगरी । उरण**

आगरी सेना प्रमुख राजाराम साळवी, आगरी सेना नेते प्रदीप साळवी, युवा आगरी सेना प्रमुख राहुल साळवी यांच्या आदेशानुसार आगरी सेनेच्या मध्यवर्ती कार्यकारिणी व रायगड जिल्हा प्रमुख सचिन मते यांच्या मार्गदर्शनाखाली उरण तालुक्यातील देवेंद्र वसंत तांडेल यांची उरण तालुका युवा आगरी सेना प्रमुख म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.



देवेंद्र तांडेल यांनी याबद्दल आगरी सेनेच्या सर्व वरिष्ठ अधिकाऱ्यांचे आभार मानले आहे. आगरी सेनेच्या ध्येय धोरणानुसार समाजाला न्याय हक्कांची जाणीव करून देऊन ते मिळवून देण्याकरिता आपण आगरी सेनेचे कार्य प्रामाणिकपणे, निष्ठेने करणार असल्याचे व उरण तालुका विभागात युवा आगरी सेना मजबूत करणे आपले प्रमुख ध्येय असल्याचे नवनियुक्त उरण तालुका युवा आगरी सेना प्रमुख देवेंद्र तांडेल यांनी सांगितले. देवेंद्र तांडेल यांची उरण तालुका युवा आगरी सेना प्रमुखपदी निवड झाल्याने त्यांच्यावर सर्वच स्तरातून अभिनंदन व शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

---

मा.गोडसे साो.

अ‍ॅड.मिरदे के. आय.

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश (व.स्तर) यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्र.१३२४/२०२१
नि.नं.७/ड
ने.ता.२८/०१/२०२२

श्रीमती.सीमा मिलींद नरवाडे, रुम नं.१९/२०, प्लॉट नं.जी.३८, वसंत विहार को.ऑ.हौ.सोसायटी लि., सेक्टर १२, खारघर, ता.पनवेल, जि.रायगड, नवी मुंबई, महाराष्ट्र ४१०२१०. तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की,

ज्याअर्थी कै.मिलींद बाबुलाल नरवाडे हे दि.८ मे २०२० रोजी स्थळ : रुम नं.१९/२०, प्लॉट नं.जी.३८, वसंत विहार को.ऑ.हौ.सोसायटी लि., सेक्टर-१२, खारघर, ता.पनवेल, जि.रायगड, नवी मुंबई, महाराष्ट्र-४१०२१० येथे मयत झाले आहेत. सदर मयताचे मृत्यूपश्चात त्यांच्या मालकीच्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**

**अ) प्लॉट नं.ए-३२/१८, अस्मिता को.ऑ.हौ.सो.लि., सेक्टर १२, खारघर, ता.पनवेल, जि.रायगड. क्षेत्रफळ-३२**

**ब) प्लॉट नं.५१ इ, सेक्टर २४, पुष्पक नोड (वहाळ), गाव-वहाळ, ता.पनवेल, जि.रायगड. क्षेत्रफळ ५० चौ.मी.**

**क) फ्लॅट नं.४०१, चौथा मजला, यश अपार्टमेंट, घर नं.०४६३, नेरुळ, नवी मुंबई ता. व जि.ठाणे. क्षेत्रफळ ३५० चौ.फूट**

सदर कै.मिलींद बाबुलाल नरवाडे यांचे नावे असणारी मालमत्ता अर्जदारांचे नावे होण्याकरिता त्यांनी मयत कै.मिलींद बाबुलाल नरवाडे यांचे वारस असल्याबाबत वारस दाखला मिळण्याकरिता मे.कोर्टास अर्ज केला आहे.

ज्याअर्थी सदर अर्जदार यांस त्यांचे मागणीप्रमाणे वारस दाखला देणेस कोणाचीही हरकत असल्यास अशा इसमांनी त्यांच्या लेखी हरकती जरुर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत या मे.कोर्टात सादर कराव्यात. विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास या अर्जदारांस त्यांचे विनंतीप्रमाणे वारस दाखला दिला जाईल याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आज दि.२४ माहे २२ सन २०२१ रोजी माझ्या सहीने व मे.कोर्टाचे शिक्क्यानिशी दिली.

**सही/-**
**क.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

---

सदरहू समन्सची बजावणी ऑर्डर ५ रुल २० प्रमाणे करण्यात यावी.
मे.गोडसे साहेबांचे कोर्ट

वादीतर्फे वकील
अ‍ॅड.राजकुमार व्ही. जाधव

### जाहीर समन्स

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांच्या न्यायालयात

स्पे.मु.नं.२९/२०२१
नि.नं.१८
ने.ता.२४/०१/२०२२

मे.विला सिटी बिल्डर्स एल.एल.पी.
(मर्यादीत भांडवल भागीदारी संस्था)
वतीने अधिकृत भागीदार श्री.लालजी अखई बेरा — वादी
विरुद्ध
श्री.मधुकर हासुराम उर्फ हाशा भगत व इतर ३ — प्रतिवादी

प्रति,
श्री.मधुकर हासुराम उर्फ हाशा भगत
रा.घर नं.१६, मु.शेलघर, पो.गव्हाण,
ता.पनवेल, जि.रायगड

ज्याअर्थी उपरिनामित वादी यांनी तुमच्या विरुद्ध सोबतच्या नक्कलेप्रमाणे या न्यायालयात वाद दाखल केलेला आहे. त्याअर्थी त्या वादासंबंधी तुम्हाला जे काही समजावयाचे असेल ते सांगण्यासाठी करिता दि.२४/०१/२०२२ रोजी सकाळी ठिक १०.३० वाजता तुम्ही स्वतः किंवा ज्यास योग्यरित्या सुचना दिलेल्या आहेत व जी वादासंबंधीच्या महत्वाच्या सर्व प्रश्नाचे उत्तर देवू शकेल अशा वकीलामार्फत किंवा अशा सर्व प्रश्नाचे उत्तर देवू शकणारा एखादा इसम बरोबर असलेल्या वकीलामार्फत या न्यायालयात उपस्थित होण्यासाठी याद्वारे तुमच्यावर समन्स बजाविण्यात येत आहे आणि याद्वारे तुम्हाला असा आदेश देण्यात येत आहे की, त्या दिवशी तुम्ही तुमच्या बचावाचे लेखी निवेदन दाखल करावे व त्याच दिवशी तुमचा बचाव किंवा उलट (सेट ऑफ) किंवा प्रतिवाद (काऊंटर क्लेम) ज्या दस्तऐवजावर आधारलेला असेल असे तुमच्या ताब्यात किंवा उलट वादाच्या (सेट ऑफ) किंवा प्रतिवादाच्या (काऊंटर क्लेम) पुष्ट्यर्थ, पुरावा म्हणून तुमच्या ताब्यात किंवा नियंत्रणाखाली असलेल्या किंवा नसलेल्या इतर कोणत्याही दस्त ऐवजावर विसंबून असाल तर अशा दस्तऐवजाची एक सुची तुमच्या बचावाच्या लेखी निवेदनास जोडावी.

तुम्हाला नोटीस देण्यात येत आहे की, वर नमूद केलेल्या दिवशी उपस्थित राहण्यास कसूर केल्यास तुमच्या अनुपस्थितीत वादाची सुनावणी केली जावून त्याचा निर्णय केला जाईल.

आणखी अशी समन्स देण्यात येत आहे की, वर नमूद केलेल्या तारखेस किंवा तत्पूर्वी बजावणीकरिता तुमचा पत्ता दाखल करण्यात तुम्ही कसूर केल्यास तुमचा बचाव रद्द केला जाण्यात पात्र ठरेल.

आज दि.२४ माहे डिसेंबर २०२१ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

**सही/-**
**क.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

---

मा.श्री.गोडसे साो.

अ‍ॅड.अनिल रा. नागदेवे
अ‍ॅड.संजय के. कानडे
अ‍ॅड.गौरव संजय कानडे

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्र.७१४/२०२१
नि.नं.७/ड
ने.ता.२९/०१/२०२२

कै.देऊबाई दगडू ठुबे (मयत) यांचे वारस
कै.मच्छिंद्र दगडू ठुबे (मयत) यांचे वारस
१) १/१) श्रीमती.रंजना मच्छिंद्र ठुबे
वय : ३३ वर्षे, धंदा : गृहिणी
१/२) कु.तुषार मच्छिंद्र ठुबे
वय : वर्षे, धंदा : नोकरी
१/३) कु.मयुर मच्छिंद्र ठुबे
वय : वर्षे, धंदा : नोकरी
सर्व रा.कर्मवीर दादासाहेब गायकवाड नगर,
चाळ नं.१९, पि.वाय.लोखन, चेंबुर, मुंबई-४०००८९
२) श्री.ज्ञानदेव दगडू ठुबे
वय : ५४ वर्षे, धंदा : शेती
३) श्री.राजेंद्र दगडु ठुबे
वय : ४६ वर्षे, धंदा : शेती
दोघेही रा.टेकाडे मळा, कान्हूर पठार पारनेर,
कान्हूर, ता.पारनेर, जि.अहमदनगर-४१४३०३ — अर्जदार

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, कै. देऊबाई दगडू ठुबे यांचे निधन २८/१२/२०१९ रोजी कान्हूर, ता.पारनेर, जि.अहमदनगर येथे निधन झालेले आहे. तसेच कै.देऊबाई दगडू ठुबे यांचा मुलगा कै.मच्छिंद्र दगडू ठुबे यांचे दि.२९/०९/२०११ रोजी चेंबुर, मुंबई येथे निधन झालेले आहे. अर्जदार क्र.१/१, १/२, १/३ व अर्जदार क्र.२ व ३ हे कै.देऊबाई दगडू ठुबे यांचे तसेच अर्जदार क्र.१/१, १/२, १/३ कै.मच्छिंद्र दगडू ठुबे यांचे हेच कायदेशीर वारस आहेत. कै.मच्छिंद्र दगडू ठुबे यांच्या नावे खालील वर्णनाची स्थावर मिळकत आहे.

सबब खालील मिळकतीसाठी वारस दाखला मिळावा म्हणून अर्जदार यांनी मे.कोर्टात अर्ज केलेला आहे.

**सदर स्थावर मिळकतीचे वर्णन**

| मिळकत | क्षेत्र | किंमत |
|---|---|---|
| **सदनिका क्र.६०१, सहावा मजला, बि विंग, क्लासिक कल्पतरु को.ऑप. हौ.सोसायटी, प्लॉट नं.१८, सेक्टर-३५, कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड** | **४१.२४ चौ.मी. (बिल्टअप एरिया)** | **रु. १२,९१,६००/-** |

तरी अर्जदार यांच्या वारसा हक्काबद्दल कोणत्याही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्याच्या आत ह्या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकती घ्यावयाच्या आहेत, जर या कालावधीमध्ये योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत, तर हे मे.कोर्ट अर्जदार यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि जर अर्जदार हे कै.देऊबाई दगडू ठुबे व कै.मच्छिंद्र दगडू ठुबे यांचे वारसदार आहेत असे सिद्ध झाल्यास अर्जदारांना वारसदाखला मंजूर करण्यात येईल.

आज दि.२४/१२/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-**
**क.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

---

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे : कोन, ता.पनवेल, जि.रायगड येथील मुळ मालक / भोगवटाधारक १) बाळाराम महादू म्हात्रे, २) शकुंतला धर्मा म्हात्रे, ३) अर्चना जनार्दन ठोंबरे, ४) अमृता धर्मा म्हात्रे उर्फ अमृता अजित पाटील, ५) भारती भरत म्हात्रे, ६) आरती भरत म्हात्रे उर्फ आरती शैलेश पाटील, ७) किर्ती भरत म्हात्रे उर्फ किर्ती ज्ञानेश्वर म्हसणे, ८) रोशनी भरत म्हात्रे उर्फ रोशनी रत्नाकर डाऊर, रा.मौजे : कोन, ता.पनवेल, जि.रायगड यांचे हिश्श्याची, मालकीची, ताबेकब्जातील, वहिवाटीतील तसेच त्यांचे नावे सातबारा सदरी नोंद असलेली खालील वर्णनाची जिरायत जमीन आमचे अशिलांनी त्यांच्याकडून कायम स्वरुपात विकत घेण्याच्या विचारात आहेत. सबब सदरहू मिळकतीचे कोणतेही नोंदणीकृत दस्त करण्यापूर्वी सदर मिळकतीमधील मुळ मालक / भोगवटाधारकांचे असलेले मालकी हक्क तपासण्याकरिता आमचे अशिलांचे वतीने सदरची जाहीर नोटीस प्रसिद्ध करीत आहेत.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : तुरमाळे, ता.पनवेल, जि.रायगड**

| अ.क्रं. | भूधारणा पद्धती | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्रफळ हे.आर.चौ.मी. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | १०८ | १ | जिरायत ००.४८.०० पैकी ००.२८.८० विक्री क्षेत्र | ०२.९५ |

एकूण क्षेत्र ००.४८.०० गुंठे पैकी १) बाळाराम महादू म्हात्रे, २) शकुंतला धर्मा म्हात्रे, ३) अर्चना जनार्दन ठोंबरे, ४) अमृता धर्मा म्हात्रे उर्फ अमृता अजित पाटील, ५) भारती भरत म्हात्रे, ६) आरती भरत म्हात्रे उर्फ आरती शैलेश पाटील, ७) किर्ती भरत म्हात्रे उर्फ किर्ती ज्ञानेश्वर म्हसणे, ८) रोशनी भरत म्हात्रे उर्फ रोशनी रत्नाकर डाऊर यांचे ००.२८.८० गुंठे क्षेत्राचे विक्रीबाबत जाहीर नोटीस

तरी वर नमूद जमिनीवर / मिळकतीवर वा मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, कुळ वहिवाट, ताबा, कब्जा, इजमेंट, साठेकरार, फरोक्त, गहाण, दान, बक्षिस, चार्ज, अटॅचमेंट, लीज वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ दिवसांच्या आत आपला हक्क, हितसंबंधाचे स्वरुप विषद करून कागदोपत्री पुराव्यासंहीत खालील सही करणार यांचे पत्यावर लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून नमूद मिळकतीबाबतचा जमीन मालक १) बाळाराम महादू म्हात्रे, २) शकुंतला धर्मा म्हात्रे, ३) अर्चना जनार्दन ठोंबरे, ४) अमृता धर्मा म्हात्रे उर्फ अमृता अजित पाटील, ५) भारती भरत म्हात्रे, ६) आरती भरत म्हात्रे उर्फ आरती शैलेश पाटील, ७) किर्ती भरत म्हात्रे उर्फ किर्ती ज्ञानेश्वर म्हसणे, ८) रोशनी भरत म्हात्रे उर्फ रोशनी रत्नाकर डाऊर, यांचे मालकी हक्क हे निर्वेध व बोजारहीत असल्याबाबत गृहीत धरुन त्याप्रमाणे सदरहू मिळकती आमचे अशिल त्यांचे नावे नोंदणीकृत खरेदीखताद्वारे कायमस्वरुपी त्यांचा वरील जमिनीमधील हिस्सा हस्तांतरीत करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे हे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत, असे गृहीत धरले जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : २४/१२/२०२१

**सही/-**
**श्री.समाधान आबासाहेब काशिद**
**वकील उच्च न्यायालय**
**ऑफिस नं.६, तळ मजला,**
**श्री. बालाजी कृपा सोसायटी, भूखंड क्रं.२८,**
**सेक्टर नं.२२, कामोठे, नवी मुंबई-४१०२०९**
**मो.नं.९०९६३९९०२०**

---

मा.गोडसे साो.

प्रो.जमा.२-२५ अर्जदाराचे वकील : अ‍ॅड.राजेश सिताराम डाकी

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर साो.यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्र.१९२५/२०२१
नि.नं.७/ड
ने.ता.०७/०२/२०२२

कै.अकिल अहमद अब्दुल मजीद सलमानी तर्फे वारस
१) श्रीमती.खुशनुदा अकील सलमानी
वय : ६२ वर्षे, धंदा : गृहिणी
२) श्री.सकील अकील सलमानी
वय : ४२ वर्षे, धंदा : मोलमजुरी
३) श्री.सगीर अकील सलमानी
वय : ४१ वर्षे, धंदा : मोलमजुरी
४) श्री.फरीद अहमद अकील अहमद सलमानी
वय : ३८ वर्षे, धंदा : मोलमजुरी
५) श्रीमती.रुबिना अकील सलमानी
वय : २७ वर्षे, धंदा : गृहिणी
६) कुमारी आयशा अकील सलमानी
वय : १९ वर्षे, धंदा : शिक्षण
वरील क्र.१ ते ६ रा.मोइनुद्दीन अपार्टमेंट
युनियन बँक जवळ, डॉ.बोंद्रे क्लिनिक समोर,
पहिला मजला, रुम नं.१०४, उरण,
ता.उरण, जि.रायगड ४००७०२
७) श्रीमती.शबिना नदीम अहमद
वय : ३१ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.मोहल्ला पठानपुरा, नजीबाबाद,
बिजनौर, उत्तरप्रदेश २४६७६३
६) श्रीमती.फारीदा फवाद सोंडे
वय : ३३ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.३७३, उरण बाजारपेठ, ता.उरण, जि.रायगड ४००७०२ — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही — सामनेवाले

ज्याअर्थी कै.अकील अहमद अब्दुल मजीद सलमानी हे दि.०४/१२/२०१३ रोजी राहत्या घरी रा.मोइनुद्दीन अपार्टमेंट, युनियन बँक जवळ, डॉ.बोंद्रे क्लिनिक समोर, पहिला मजला, रुम नं.१०४, उरण, ता.उरण, जि.रायगड ४००७०२ येथे मृत्यू पावले असून त्यांचे नावे खालील वर्णनाची मिळकत आहेत.

**१) मिळकतीचे वर्णन**
**मौजे : उरण, ता.उरण, जि.रायगड**

**मिलन शॉपिंग सेंटर या इमारतीमधील तळ मजल्यावरील शॉप नं.बी/३ बी-विंग, उरण, ता.उरण, जि.रायगड ४००७०२ क्षेत्र-२४३ चौ.फूट (कारपेट) उरण नगरपरिषद, उरण असेसमेंट/मालमत्ता क्र.११५ ब**

**२) मिळकतीचे वर्णन**
**मौजे : उरण, ता.उरण, जि.रायगड**

**मोइनुद्दीन अपार्टमेंट मधील पहिला मजला, रुम नं.१०४, उरण, ता.उरण, जि.रायगड ४००७०२ क्षेत्र ८५० चौ.फूट (बिल्टअप) ७८.९९ चौ.मी. (बिल्टअप), उरण नगरपरिषद, उरण असेसमेंट/मालमत्ता क्र.४३२**

**३) मिळकतीचे वर्णन**
**मौजे : द्रोणागिरी नोड, ता.उरण, जि.रायगड**

**प्राईडविल्ला या इमारतीमधील तळमजल्यावरील शॉप नं.०२, भूखंड क्र.९९, सेक्टर क्र.१५, द्रोणागिरी नोड (नवी मुंबई) उरण, ता.उरण, जि.रायगड ४००७०२ क्षेत्र ५.१३० चौ.मी. (कारपेट), ६.१५६ चौ.मी. (बिल्टअप), द्रोणागिरी नोड, ता.उरण**

कै.अकिल अहमद अब्दुल मजीद सलमानी यांचे मृत्यूपश्चात त्यांस अर्जदार क्र.१ ते ८ हेच वारस आहेत. सदर वारसां व्यतिरिक्त इतर कोणीही वारसदार नाहीत. सबब अर्जदार यांनी सदरचा वारस दाखला मिळण्यासाठी अर्ज करीत आहे. सबब, सदरचा वारस दाखला अर्जदार यांस देण्यासंबंधी कोणाही इसमाच्या कोणत्याही हरकती असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसांचे आत या न्यायालयात सादर कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास कोणत्याही हरकती नाहीत असे समजून अर्जदार यांस वारस दखला देण्यात येईल व मागाहून येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.२२/१२/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-**
**क.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

# संक्षिप्त...

## म्हसळ्यात दोन सर्व साधारण, दोन महिला आरक्षणे जाहीर

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

स्थानिक स्वराज्य संस्थामधील ओबीसी समाजाचे २७ टक्के आरक्षण रद्द करण्याच्या सर्वोच्च न्यायालयाच्या नगरपंचायतच्या चार जागांच्या निवडणुकांसाठी आरक्षण गुरुवारी जाहीर करण्यात आले.

ओबीसी मधून खुल्या प्रवर्गात गेलेल्या एकूण चार जागांसाठी १८ जानेवारीला मतदान होईल. त्यानंतर १९ जानेवारी रोजी त्याचा निकाल जाहीर केला जाईल. या चार जागांसाठी वार्ड क्र.२ मध्ये सर्वसाधारण खुला,वार्ड क्र.७ मध्ये सर्व साधारण महिला,वार्ड क्र.८ मध्ये सर्वसाधारण महिला, वार्ड क्र.९ मध्ये सर्वसाधारण खुला प्रवर्गासाठी आरक्षित राहणार आहे.निवडणूक कार्यक्रमनुसार उमेदवारांना २९ डिसेंबर ते ३ जानेवारी पर्यंत आपले नामनिर्देशन पत्र दाखल करता येणार आहे.तर ४ जानेवारीला नामनिर्देशन पत्राची छाननी करण्यात येणार आहे, तर नामनिर्देशन पत्र मागे घेण्याची तारीख १० जानेवारी असणार असल्याचे जाहीर करण्यात आले आहे.म्हसळा नगरपंचायत निवडणुकीत एक जागा बिनविरोध आली असून १२ जागांसाठी २१ डिसेंबर रोजी मतदान घेण्यात आले होते. उर्वरित चार जागांसाठी १८ जानेवारीला मतदान होणार आहे. या चार जागा सत्तास्थापनेसाठी महत्त्वाच्या असल्याने या चार जागांसाठी होणाऱ्या निवडणुका चुरशीच्या होणार हे नक्की आहे.

## स्नेह जेष्ठ नागरिक कल्याणकारी मंडळ कोलाड यांची यांची वार्षिक सहल उत्साहात संपन्न

**दै.रायगड नगरी । गोवे-कोलाड**

स्नेह जेष्ठ नागरिक कल्याणकारी कोलाड यांची वार्षिक सहल मंगळवार दि.२१ /१२/२०२१ रोजी मोठ्या उत्साही वातावरणात संपन्न झाली.

स्नेह जेष्ठ नागरिक कल्याणकारी मंडळ कोलाड या मंडळाची स्थापना झाल्यापासून दरवर्षी वार्षिक सहलीचे आयोजन करण्यात येते परंतु गेल्या वर्षी कोरोनामुळे सर्वत्र बंदी घालण्यात आली होती यामुळे गेल्या वर्षी वार्षिक सहलीचे आयोजन करण्यात आले नव्हते. परंतु या वर्षी सर्वत्र बंदी उठविल्यानंतर या वर्षी कोलाड जेष्ठ नागरिक मंडळाच्या वार्षिक सहलीचे आयोजन करण्यात आले.

यावेळी कोलाड जेष्ठ नागरिक कल्याणकारी मंडळाचे अध्यक्ष मारुती राऊत यांच्या अध्यक्षतेखाली मुगावली येथील स्वयंभु गणपती मंदिर, हरिहरेश्वर, श्रीवर्धन येथील सोमजाई मंदिर,व दिवेआगर येथील सोन्याचा गणपती येथे सहलीचे आयोजन करण्यात आले होते.

# आ.बाळाराम पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त उलवेमध्ये स्वच्छता मोहीम

### शे.का.प. आणि जे.एम.म्हात्रे चॅरिटेबल संस्थेचा पुढाकार

**दै.रायगड नगरी । पनवेल**

२९ डिसेंबर २०२१ रोजी शेतकरी कामगार पक्षाचे आमदार बाळाराम पाटील यांचा वाढदिवस आहे. या वाढदिवसाचे औचित्य साधून शेतकरी कामगार पक्ष उलवे आणि विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे यांच्या जे.एम.म्हात्रे चॅरिटेबल संस्थेच्या माध्यमातून उलवे नोड येथे स्वच्छता मोहिमेचे नियोजन २६ डिसेंबर रोजी सेक्टर १७ उलवे येथे करण्यात आले आहे.




या स्वच्छता मोहीमे संदर्भात अधिक माहिती देताना सचिन राजे यांनी सांगितले की आज पर्यंत आम्ही उलवे नोडमध्ये शेतकरी कामगार पक्षाच्या माध्यमातून नागरिकांचे विविध प्रश्न सोडविले अजूनही बऱ्याच समस्या आहेत त्या सुद्धा आम्ही आमचे नेते नारायणशेठ घरत, रवीशेठ पाटील, राजेंद्र पाटील, जितेंद्र म्हात्रे, रवींद्र पाटील, सौ. पूजा प्रशांत पाटील, सौ.माईताई भोईर, सचिन घरत, अमित घरत, रोशन म्हात्रे, हेमंत पाटील, राजेंद्र घरत, रमेश ठाकूर, सौ.शिल्पा कडू व इतर मान्यवर नेते यांच्या मार्गदर्शनाखाली सोडवू याचा विश्वास येथील नागरिकांमध्ये आहे.

आठ दिवसापूर्वी शेकापचे नेते आणि पनवेल महानगरपालिकेचे विरोधी पक्षनेते प्रितमदादा म्हात्रे यांच्या अध्यक्षतेखाली वृक्षारोपणाचा कार्यक्रम ठेवण्यात आला. त्या कार्यक्रमाला शेकडो नागरिकांनी सहभाग नोंदवला. त्याप्रसंगी नागरिकांनी उलवे नोड मधील बऱ्येचसे गार्डन प्लॉट हे अतिक्रमण आणि डेव्हलप न झाल्यामुळे नागरिकांना वापरात येत नाहीत अशी तक्रार केली. त्याप्रसंगी प्रितम दादांनी सदर प्लॉट आपण सुचवा त्या सर्व प्लॉटवरील स्वच्छतेची जबाबदारी आपण शेतकरी कामगार पक्ष आणि जे.एम.म्हात्रे चॅरिटेबल संस्थेच्या माध्यमातून करूया असे सांगितले आणि त्याचाच एक भाग म्हणून आमदार बाळाराम पाटील साहेबांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून सर्व नागरिकांच्या वतीने स्वच्छता मोहिमेचे आयोजन करण्यात आले आहे. शेतकरी कामगार पक्ष कार्यालय सेक्टर १७ उलवे येथील कार्यालयाच्या ठिकाणी सकाळी नऊ वाजता सदर मोहिमेचा शुभारंभ होईल असे त्यांनी सांगितले.

# सामाजिक संकटात वाढदिवस साजरा करणार नाही ; वसंत ओसवाल

**दै.रायगड नगरी । कळंबोली**

करोना सारख्या जागतिक महामारी च्या संकटाने सामाजिक , सार्वजनिक जनजीवन अस्तव्यस्त झाले असताना सामाजिक बांधिलकीचे भान जपत व हितचिंतक, पक्षाचे कार्यकर्ते यांच्या प्रेमाचा आदर करून यावर्षी माझा वाढदिवस साजरा न करण्याचे निश्चित केले असल्याने या वर्षी २५ डिसेंबरला मी पालीत उपलब्ध नसल्याचे माझ्या हितचिंतक पक्षाचे कार्यकर्ते तसेच संस्थेच्या कोणत्याही कर्मचारी वर्गाने पालीत शुभेच्छा देण्यासाठी न येण्याचे आवाहन राष्ट्रवादी कॉंग्रेसचे जेष्ठ नेते व सुधागड एज्युकेशन सोसायटीचे विद्यमान अध्यक्ष वसंत ओसवाल यांनी आपल्या केले आहे.



राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या स्थापनेपासून सलग तीन वेळा रायगड जिल्हा राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या अध्यक्ष पदाची धुरा समर्थपणे सांभाळणारे , इतर मागास वर्गीय व वित्त विकास महामंडळाचे अध्यक्ष पद भूषविणारे व रायगड जिल्ह्यातील शिक्षण क्षेत्रात नामांकित असणाऱ्या सुधागड एज्युकेशन सोसायटीचे विद्यमान अध्यक्ष वसंत गणेशमल ओसवाल यांचा दरवर्षी २५ डिसेंबरला वाढदिवस मोठ्या धुमधडाक्यात पक्षाचे कार्यकर्ते ,हितचिंतक व संस्थेचे कर्मचारी वर्ग पालीमध्ये साजरा करीत असतात. यावर्षी ते ८० व्या वर्षात पदार्पण करीत आहेत.यावेळी जिल्हाभरातून मोठ्या संख्येने पक्षाचे कार्यकर्ते, हितचिंतक हे पालीत येऊन वसंत ओसवाल यांना दीर्घायुष्य व जीवनात आनंद मिळावा यासाठी हार्दिक शुभेच्छा देण्यासाठी येतात. परंतु यावर्षी जागतिक करोना महामारी च्या संकटाने सर्वच सार्वजनिक, सामाजिक जनजीवन विस्कळीत झाले असल्याने व करोना महामारी चे संकट समाजावर आले असल्याने या वर्षी २५ डिसेंबर ला वाढदिवसाचा कार्यक्रम साजरा न करण्याचे वसंत ओसवाल यांनी ठरवले आहे. तसेच वाढदिवसाच्या दिवशी ते पालितील निवासस्थानी उपलब्ध नसल्याने कोणत्याही पक्षाच्या कार्यकर्त्यांनी हितचिंतकांनी व सुधागड एज्युकेशन सोसायटीच्या कर्मचारी वर्गाने व प्राचार्यांनी पालीत वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यासाठी येऊ नये असे आवाहन त्यांनी केले आहे .पक्षाचे कार्यकर्ते व जिल्ह्यातील विविध अन्य पक्षांच्या कार्यकर्त्यांचे मिळत असलेले भरभरुन प्रेम हेच माझ्या आनंदी जीवनाचे गमक असल्याने आपल्या आनंददायी व प्रेरणा देणाऱ्या शुभेच्छा मनाला आनंदी राहण्यासाठी उर्जा देत असल्याचेही त्यांनी सांगितले आहे.

# तळेगाव ग्रामपंचायतीत शिवसेना पुरस्कृत उमेदवार सुरेश कदम विजयी

**दै.रायगड नगरी । तळा**

तळा तालुक्यातील तळेगाव ग्रामपंचायतीच्या पोटनिवडणुकीत शिवसेना पुरस्कृत उमेदवार सुरेश कदम विजयी झाले आहेत या ग्रामपंचायतीच्या पोटनिवडणुकीसाठी मंगळवारी मतदान प्रक्रिया पार पडली होती. बुधवारी सकाळी तळा तहसील कार्यालयात मतमोजणी झाली.

या पोटनिवडणुकीत शिवसेना पुरस्कृत उमेदवार सुरेश कदम यांनी गजानन तळेगावकर यांचा पराभव केला. कदम यांना ५१ मते तर तळेगावकर यांना ४४ मते मिळाली. चार मतदारांनी नोटाचा वापर केला.

मतमोजणी दरम्यान तहसील कार्यालय परिसरात पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. दरम्यान, निकालानंतर शिवसेना कार्यकर्त्यांनी जल्लोष केला. तसेच तालुका प्रमुख प्रदुम्न ठसाळ, शहर प्रमुख राकेश वडके यांनी विजयी उमेदवारांचे अभिनंदन केले. तळेगाव ग्रामपंचायतीचे उपसरपंच संदीप दळवी उपविभाग प्रमुख भगवान शिंदे यांनी कदम यांच्या विजयात मोलाचा वाटा उचलला असल्याचे विजयी उमेदवार कदम यांनी सांगितले व सर्व मतदारांचे आभार मानले.



# श्री साई नारायण बाबा आश्रमात श्री महाचंडी महायज्ञ



**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेलच्या रेल्वे स्टेशन मार्गावरील श्री साई नारायण बाबा आश्रमात (श्री साई मंदिर) ६१वा विश्वशांती श्री महाचंडी महायज्ञ संपन्न झाला. या महायज्ञासाठी देश-विदेशातील भक्त उपस्थित होते.

मानव कल्याण, विश्वशांती आणि धर्मस्थापना या उद्देशाने या महायज्ञाचे आयोजन करण्यात आले होते. १३ यज्ञकुंड,२१ शास्त्री यांच्या मंत्रोच्चाराने विधिवत महायज्ञ पूर्ण करण्यात आला. सद्गुरु श्री साई नारायण बाबा आपल्यात नसताना हा महायज्ञ होत असल्याची भावना भाविकांनी दु:खद अंतकरणाने व्यक्त केली. साईबाबांची मंदिरे स्थापन करणे, गरीब-गरजूंची सेवा करणे ही शिकवण सद्गुरू श्री साई नारायण बाबा यांनी दिली आहे.

सद्गुरू श्री साई नारायण बाबा हे यापूर्वी शिर्डीला न चुकता दरवर्षी या महायज्ञाचे आयोजन करत होते, आता हा महायज्ञ पनवेलमध्ये होत आहे.

या महायज्ञा वेळी गोदान करण्यात आले. सद्गुरु श्री साई नारायण बाबा यांचे विचार, महाचरण पूजा तसेच आरती आणि महाप्रसाद यांचा भाविकांनी मनोभावे लाभ घेतला. या श्री महाचंडी महायज्ञाचे आयोजन श्री भगवती साई संस्थानचे चेअरमन खेमचंद गोपलानी, सेक्रेटरी रामलाल चौधरी, कोऑर्डिनेटर राम थंदानी यांनी उत्कृष्टरित्या केले.

# पोलीस असल्याचे भासवून २५ लाखाची लुट करणारी टोळी अटकेत

### गुन्ह्यातील १५ लाख १८ हजाराची रक्कम हस्तगत करण्यात गुन्हे शाखा युनिट-१ ला यश

**दै.रायगड नगरी । पनवेल**

ऍल्युमिनीयम विक्रीच्या व्यवहारातील जमा केलेली २५ लाख ३२ हजाराची रोख रक्कम मोटारसायकलवरुन नवी मुंबईत घेऊन जाणाऱ्या दोन कर्मचाऱ्यांना पोलीस असल्याचे भासवून लुटणाऱ्या टोळीतील ६ आरोपींना गुन्हे शाखा युनिट-१च्या पथकाने अटक केली आहे. तसेच सदर गुन्ह्यातील १५ लाख १८ हजारांची रोख रक्कम व आरोपींनी गुन्ह्यात वापरलेली बुलेट व स्विफ्ट डिझायर कार जप्त केली आहे. अशी माहिती पोलीस आयुक्त बिपीनकुमार सिंह यांनी पत्रकार परिषदेत दिली.

एपीएमसी मार्केटमधील अल्युमिनियमच्या व्यापाऱ्याकडे कामाला असलेले दोन कर्मचारी गत १२ नोव्हेंबर रोजी रात्री ऍल्युमिनीयम विक्रीच्या व्यवहारातील २५ लाख ३२ हजाराची रोख रक्कम घेऊन मोटारसायकलने मुंबईतून ऐरोलीमार्गे नवी मुंबईत येत असताना, बुलेट मोटारसायकलवरुन दोघा लुटारुंनी त्यांचा पाठलाग केला होता. त्यानंतर सदर लुटारुंनी पोलीस असल्याचे भासवून दोघा कर्मचाऱ्यांना ऐरोलीत अडवून रोख रक्कमेच्या बॅगेसह एका कर्मचाऱ्याला जबरदस्तीने आपल्या बुलेटवर बसवून त्याला पुर्व द्रुतगती मार्गावर कांजुरमार्ग येथे नेले होते. त्यानंतर सदर कर्मचाऱ्याला बेदम मारहाण करुन २५ लाख ३२ हजाराची रोख रक्कम असलेली बॅग लुटून पलायन केले होते. या प्रकरणी रबाळे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाल्यानंतर गुन्हे शाखा युनिट-१चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनिल शिंदे, सहाय्यक पोलीस निरीक्षक राजु तडवी, निलेश पाटील व त्यांच्या पथकाने तत्काळ घटनास्थळी भेट देऊन गुन्ह्याचा बारकाईने अभ्यास करुन, तांत्रीक तपास करुन गुन्हेगार आलेले व पळून गेलेल्या मार्गावरील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची तपासणी करुन २४ तासाच्या आत या गुन्ह्यातील आरोपी निष्पन्न केले. त्यानंतर मुंबईतील मालाड, कुरार, पठाणवाडी या भागातून सुनिलकुमार रुपनारायण यादव (३६), पलटू उर्फ बंगाली परेशचंद्र प्रधान (४९), अफजल कादीर कन्नाड (३९), ज्ञानेद्रकुमार विष्णुनारायण गुप्ता उर्फ गुड्डू (४७), व शफीभाई उर्फ जाड्या उर्फ शफीक मोहम्मद इकबाल शेख (४१) या पाच जणांना अटक केली. मात्र महिनाभरापासून फरार असलेला या गुन्ह्यातील मुख्य आरोपी इम्रान इस्माईल सिदातर उर्फ इम्रान घाची उर्फ श्यामभाई (४३) हा पोलिसांच्या हाती लागला नव्हता. त्यामुळे गुन्हे शाखेचे पथक गत महिनाभर त्याच्या मागावर होते. अखेर पोलिसांनी त्याला देखील मालाड येथून अटक केली. तसेच त्याच्याकडून व इतर आरोपींकडून १५ लाख १८ हजारांची रोख रक्कम व स्वीफ्ट डिझायर कार व एक बुलेट हस्तगत केली. या आरोपींच्या चौकशीत अल्युमिनियमच्या व्यापाऱ्याकडे पुर्वी चालक म्हणून कामाला असलेल्या पलटू उर्फ बंगाली परेशचंद्र प्रधान याने दिलेल्या टिपवरुन सदरचा गुन्हा केल्याची कबुली दिली.

या गुह्यातील मुख्य आरोपी इम्रान इस्माईल हा रेकॉर्डवरील सराईत ग्रहेगार असून त्याच्यावर यापुर्वी मुंबईतील डिएन नगर, ओशीवरा आणि कुरार या पोलीस ठाण्यात विविध प्रकारचे ग्रहे दाखल आ-हेत. या गुन्हाची योजना देखील त्यानेच आखुन इतरांना त्याने या कटात सहभागी केल्याचे तपासात आढळुन आले आहे. २५ लाख ३२ हजाराची रक्कम लुटल्यानंतर या गुह्यात सहभागी असलेले इतर आरोपी २४ तासाच्या आत पोलिसांच्या हाती लागले होते. मात्र इम्रान इस्माईल हा पोलिसांच्या हाती लागत नव्हता, त्यामुळे गुन्हे शाखेने त्याचा गुजरात व राजस्थान येथे गत महिनाभर शोध घेतला. अखेर महिन्याभरानंतर तो मालाड येथील आपल्या घरी आल्यानंतर पोलिसांनी त्याला अटक केली.

एपीएमसीतील अल्युमिनियमचे व्यापारी मुंबईतील व्यावसायीकांना ऍल्युमिनीयम व इतर प्रकारचा माल पुरवितात. तसेच त्यांच्याकडे कामाला असलेले कर्मचारी प्रत्येक गुरुवारी मुंबईतील व्यावसायीकांकडून ऍल्युमिनीयमच्या विक्री व्यवहारातील लाखो रुपये जमा करुन घेऊन येत असतात. याबाबतची माहिती अल्युमिनियमचे व्यावसायिकांकडे पुर्वी चालक म्हणुन कामाला असलेल्या पलटू उर्फ बंगाली परेशचंद्र प्रधान (४९) याने आरोपींना दिल्यानंतर इम्रान इस्माईल याने रोख रक्कम घेऊन जाणाऱ्या कर्मचाऱ्यांना लुटण्याची योजना आखल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.

# सत्यमेव जयते संघटनेच्या तक्रारीनुसार कळंबोली येथील आरे दूध केंद्राला नोटीस

**दै.रायगड नगरी । पनवेल**

सत्यमेव जयते समाजिक संघटनेच्या तक्रारीनुसार महाराष्ट्र राज्याच्या दुग्ध व्यवसाय विभागाने कळंबोली येथील एका दुध केंद्राला करारनामा अटीशर्तीचे उल्लंघन केल्याबद्दल नोटीस बजावली आहे.

कामोठे येथील सत्यमेव जयते समाजिक संस्था, संघटनेने कळंबोली स्टील मार्केट येथील आरे दूध वितरण एजन्सीला दुग्धशाळा व्यवस्थापक शासकीय दूध योजना खोपोली यांच्या कडून करारनाम्यातील अटी व शर्ती चे उल्लंघन केल्याबद्दल महाराष्ट्र शासनाकडे त्यांची तक्रार केली होती. सदर तक्रारीची दखल शासनाने घेऊन सदर संस्थेला आपली एजन्सी रद्द करून गुन्हा दाखल का करू नये व तात्काळ खुलासा करण्यासंदर्भात ता. २० रोजी पत्र काढले आहे. सदरची दूध वितरक एजन्सी ही सुशिक्षित बेकार म्हणून मंजूर करण्यात आ-लेली होती, परंतु सदर दूध वितरण केंद्र धारक यांनी सुशिक्षित बेकार असल्याचा खोटा पुरावा आरे कडे सादर केला असल्याचा आरोप राज्य महासचिव, सत्यमेव जयते संघटना सुनिल शिरीषकर यांनी केला आहे. तसेच सदरची एजंटही सुभाष ढवळे चालवत नसून दुसऱ्या इसमाला ती करार करून भाड्याने चालवायला दिली असल्याचेही निदर्शनास आले आहे.

> सुशिक्षित बेरोजगारांचा हक्क हिरावून घेऊन सदर आरे दूध वितरण एज-न्सी धारकाने खोटी कागदपत्रे सादर करून एका सुशिक्षित बेकारावर अन्याय केला आहे. सदरची दूध वितरण एजन्सी रद्द करून फसवणूक करणार्या एजन्सी चालकावर गुन्हा दाखल करावा व सदर एजन्सी एखाद्या होतकरू सुशिक्षित बेकार आला चालवण्यास द्यावी अशी विनंती संघटना दुधशाळा व्यवस्थापक शासकीय दूध योजना खोपोली यांच्याकडे करणार आहे.
>
> **सुनील शिरीषकर राज्य महासचिव,**
> **सत्यमेव जयते संघटना.**

सदर केंद्रामध्ये दूधा बरोबर काही दुग्धजन्य पदार्थ विक्री ला परवानगी दिली आहे. तसेच या एजन्सी ने अद्याप पर्यंत एकदाही आरेचे दूध विक्रीसाठी घेतल्याची नोंद आरे कडे नाही. या ठिकाणी गॅस बाटला व शेगडी च्या साह्याने चहा, नाष्टा बनवून विकण्यासाठी छोटेखानी हॉटेल केल केले आहे. असे तक्रारदाराने नमूद केल्यामुळे त्यांनी शासनाबरोबर केलेल्या करारनाम्यातील अटी व शर्तीचा भंग केल्याचे निदर्शनास आले तर सदर एजन्सी बंद करून कारवाई करण्यात येईल असे शासनाने त्यांनी काढलेल्या नोटीसमध्ये म्हटले आहे.

# महादेव घरत यांच्या हस्ते क्रिकेट स्पर्धांचे उद्घाटन

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण तालुक्यात सध्या सर्वत्र क्रिकेट स्पर्धा चालू असून बापदेव क्रिकेट क्लब बोकडवीरा आयोजित ओव्हरआर्म क्रिकेट टूर्नामेंट क्रिकेट स्पर्धा केअर पॉईंट हॉस्पिटल समोरील मैदान बोकडविरा येथे सुरु झाली असून या स्पर्धेचे उद्घाटन कामगार नेते महादेव घरत यांनी केले. तसेच अंबादेवा क्रिकेट मैदान डोंगरी येथे स्वर्गीय निलेश घरत (लाडू )स्मृती चषक २०२१ चे उद्घाटन महादेव घरत यांनी केले.

यावेळी महादेव घरत यांच्या हस्ते नारळ वाढवून (फोडून ) टॉच उडवून स्पर्धेची सुरवात झाली.

यावेळी शिक्षक नेते नरसु पाटील, जिल्हा परिषद सदस्य विजय भोईर, उद्योजक विकास भाईर, माजी शाखा प्रमुख हेमंत पाटील, मिलिंद ठाकूर, सामाजिक कार्यकर्ते अनंत घरत, डोंगरीचे सामाजिक कार्यकर्ते किरण घरत, उरण तालुका महिला कॉंग्रेस कमिटी अध्यक्षा रेखा घरत आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.

